**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे घाना संसदेला संबोधन (03 जुलै 2025)**

03 जुलै 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घाना संसदेत आयोजित विशेष अधिवेशनाला संबोधित केले. अशाप्रकारचे संबोधन करणारे पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. घाना संसद अध्यक्ष अल्बन किंग्सफर्ड सुमाना बॅगबिन यांच्या अध्यक्षतेखाली हे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले होते. या अधिवेशनाला घाना आणि भारताचे संसद सदस्य, शासकीय अधिकारी यांच्यासह निमंत्रित मान्यवर उपस्थित होते. या संबोधनाच्या माध्यमातून भारत आणि घानामधील परस्पर संबंधांनी एक नवा ऐतिहासिक टप्पा गाठला. या संबोधनातून उभय देशांमधील परस्पर आदर, सन्मान तसेच उभय देशांना एकत्र आणणाऱ्या परस्पर सामायिक लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब उमटले

2. आपल्या भाषणात, पंतप्रधानांनी भारत आणि घाना यांमधील ऐतिहासिक संबंध अधोरेखित केले. ज्यामुळे स्वातंत्र्यासाठीचा सामायिक संघर्ष, लोकशाही तसेच सर्वंकष विकासासाठी सामाईक वचनबद्धता अधोरेखित होते. पंतप्रधानांनी राष्ट्रीय सन्मानाबद्दल घानाचे राष्ट्राध्यक्ष महामहिम जॉन ड्रामानी महामा तसेच घानाच्या जनतेचे आभार मानले. पुरस्कार हा कायमस्वरूपी मैत्रीचं प्रतीक ठरेल असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. घानाचे महान नेते डॉ. क्वामे एनक्रुमाह यांच्या योगदानाचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. एकता, शांती आणि न्यायाचे आदर्श हे मजबूत आणि चिरस्थायी भागीदारीचा पाया असल्याचा उल्लेख केला.

3. डॉ. एनक्रुमाह यांचे, "आपल्याला एकत्र आणणाऱ्या शक्ती अंतर्निहित आहेत आणि आपल्याला वेगळे ठेवणाऱ्या प्रभावांपेक्षा मोठ्या आहेत" हे संबोधन भाषणातून उल्लेखित केले. ज्यांनी लोकशाही संस्थांच्या उभारणीच्या दीर्घकालीन परिणामावर खूप भर दिला. पंतप्रधानांनी लोकशाही मूल्यांचे भरपोषण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. लोकशाहीची जननी म्हणून भारताने आपल्या संस्कृतीचा एक भाग म्हणून लोकशाही मूल्ये स्वीकारल्याचे अधोरेखित करताना पंतप्रधानांनी भारतातील लोकशाहीच्या दृढ आणि चैतन्यदायी बाबींवर प्रकाश टाकला. पंतप्रधानांनी भारतीय विविधता आणि लोकशाही ताकद ही विविधतेतील एकतेच्या शक्तीचा पुरावा म्हणून दाखवली. घानाच्या स्वतःच्या लोकशाही प्रवासात मूल्य अंतर्भूत आहेत. पंतप्रधानांनी हवामान बदल, दहशतवाद, साथीचे रोग आणि सायबर धोके यासारख्या जागतिक आव्हानांवरही प्रकाश टाकला. जागतिक प्रशासनात एकत्रित ग्लोबल साउथच्या एकमताचे आवाहन केले. या संदर्भात, त्यांनी भारताच्या अध्यक्षतेच्या काळात आफ्रिकन संघाचा G20 चा स्थायी सदस्य म्हणून समावेश अधोरेखित केला.

4. घानाच्या चैतन्यदायी संसदीय प्रणालीची पंतप्रधान मोदी यांनी आपल्या संबोधनात प्रशंसा केली. उभय देशांच्या संसदेच्या दरम्यान वाढत्या आदान-प्रदानाबाबत समाधान व्यक्त केले. याच अनुषंगाने त्यांनी घाना-भारत संसदीय मैत्री सोसायटीच्या स्थापनेचे स्वागत केले. वर्ष 2047 पर्यंत देशाला

विकसित राष्ट्र बनवण्याप्रती भारतीयांचा अढळ निर्धार व्यक्त केला. प्रगती आणि समृद्धीच्या दिशेने सुरु असलेल्या घानाच्या प्रयत्नांमध्ये भारत समर्थपणे उभा असल्याचा विश्वास व्यक्त केला.

5. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे उपलब्ध असेल. here

अक्रा

03 जुलै 2025